महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-३६२३/प्र.क्र.१८७/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २४ जून, २०२४

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर.

विषय:- वनजमिन-गडचिरोली
पोलीस मदत केंद्र (Arm Out Post) च्या प्रशासकीय इमारत व इतर बाबींकरीता मौजे पिपली बुर्गी, ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथील ४.०० हे. संरक्षीत वनजमीन वळतीकरणाबाबत.

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. डी-१७/एफसीए-एस१/पीआयडी-३६८०३/गडचिरोली /३३३६, दि.०४.०३.२०२४.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास सादर करावी:-

(१) प्रस्तावातील KML File चे अवलोकन केले असता, वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या काही वनक्षेत्रावर बांधकाम केल्याचे दिसून येते. सबब, सदर प्रकरणी वनभंग झाला किंवा कसे, याबाबतची माहिती सादर करावी.

(२) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्राचे KML File चे अवलोकन केले असता, सदर क्षेत्रावर ५० टक्के पेक्षा अधिक क्षेत्रावर झाडे दिसून येतात. सबब, सदर क्षेत्रावर प्रतिहेक्टरी १११११ रोपांची लागवड करता येईल किंवा कसे, नसल्यास पर्यायी वनीकरणासाठी अन्य अवनत वनजमिन प्रस्तावित करणे आवश्यक आहे किंवा कसे, याबाबत अभिप्राय सादर करावेत.

(३) प्रस्तावित वनक्षेत्र राष्ट्रीय उद्यान, वन्यजीव अभयारण्य यांचे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशिल क्षेत्र (ESZ) मध्ये येते किंवा कसे (प्रत्यक्ष/Deemed) याबाबत स्पष्ट अभिप्राय सादर करावे तसेच सदर अंतर दर्शवणारा नकाशा व उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र सादर करावे.

(४) जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्यामार्फत सादर करण्यात आलेल्या FRA प्रमाणपत्रावर शिक्का दिसून येत नाही. सबब, त्यानुसार प्रमाणपत्र सादर करावे.

Scanned with OKEN Scanner

(५) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या वनजमिनीचे अधिकार अभिलेख सादर करावेत.

(६) प्रकल्पाच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक/प्रशासकिय मान्यता घेतली आहे किंवा कसे, याबाबतची माहिती सादर करावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मुख्य वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली
उप वनसंरक्षक, भामरागड

Scanned with OKEN Scanner